**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**

**अ प्रभाग समिती**

**सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०५]**

**दिनांक : १४/०८/२०१८** **वेळ : सकाळी ११.३० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑगष्ट **2018** ची मासिक सभा मंगळवार दिनांक १४/०८/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 3. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 4. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 5. | मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 6. | मा.प्रमोद कुटे | सदस्य |
| 7. | मा.राजू मिसाळ | सदस्य |
| 8. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / माजी उपमहापौर |
| 9. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 10. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 11. | मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | सदस्य |
| 12. | मा.कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| 13. | मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे | सदस्य |
| 14. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 15. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 16. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा. श्री दिपक सुपेकर-प्र.कार्यकारी अभियंता स्थापत्य,मा.श्री. प्रवीण लडकत –कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री.प्रशांत पाटील-कार्यकारी अभियता जलनि:स्सारण, मा.श्री आर.के.लटपटे –प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), मा.श्री कदम पी.जे.लेखाधिकारी, मा.श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, मा.श्री मोहन खोंद्रे व मा.श्री हरिदास सुनिल-उपअभियंता(झोनिपु) मा.श्री विजय जाधव-उपअभियता(उदयान) मा.श्री चंद्रकांत मुठाळ व मा.श्री लक्ष्मीकांत कोल्हे-उपअभियता(स्थापत्य ), मा.श्री. राजेंद्र राणे, मा.श्री कुंभार डी. एम. व मा.श्री अहिरे एस.एन. उपअभियंता (पाणी पुरवठा), मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियता(ड्रेनेज ), श्री घुले एस.एम.व.आ., सर्वश्री श्री. निखील फेंडर , श्री कुंभार प्र.गो, श्री अभिमान भोसले,श्री सुनिल प्र.पवार, श्री गिरिश गुठे, श्री. पाटील एस.पी. -कनिष्ठ अभियंता. श्री डी.जी.कांबळे.उदयान सहाय्यक, श्री स्वप्निल जी. पगार, जनरेटर ऑपरेटर इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी उपस्थित मा.महापौर,मा.उपमहापौर तसेच सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

बैठकीचे सुरुवातीस नवनिर्वाचित महापौर मा.श्री राहुल जाधव तसेच उपमहापौर मा.श्री सचिन चिंचवडे यांचा अ प्रभाग समितीचे वतीने सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र.४ दि. १०/०७/२०१८ रोजीचा अ प्रभाग समितीचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक:-५** सन्मा.सभापती अनुराधा गोरखे,अ प्रभाग समिती यांचा दिनांक ३१/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

महात्मा ज्योतिराव फुले जेष्ठ नागरिक संघ यांचे दि.३१/७/२०१८ चे पत्रास अनुसरुन महात्मा ज्योतिराव फुले जेष्ठ नागरिक संघ यांचे विरंगुळा केंद्राला बहिरवाडे क्रिडांगणातील पक्की जागा (मैदानातील वाचनालय) मिळणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ६ :-** सन्मा.सदस्य् प्रमोद प्रभाकर कुटे यांचा दिनांक १४/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

विठ्ठल मंदिर, विठ्ठलवाडी, आकुर्डी लगत असणा-या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी तळावर गेल्या काही दिवसापासून महानगरपालिकेच्या जागेवर दर शनिवारी अनधिकृतरित्या आठवडे बाजार घेतला जात आहे. परंतु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी मार्गाचे क्रॉंक्रिटीकरणाचे काम चालू असल्यामुळे सदर रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या मोठया प्रमाणावर निर्माण झाली आहे. या वाहतूक कोंडीमुळे त्या ठिकाणी अपघाताची संख्या वाढली आहे. तरी सदर आठवडे बाजार तातडीने बंद करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ७ :-** सन्मा.सदस्य् प्रमोद प्रभाकर कुटे यांचा दिनांक १४/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१४ मधील महानगरपालिकेच्या असलेल्या कांतीलाल खिंवसरा विद्यालय, मोहननगर,चिंचवड,पुणे १९ या शाळेमधील एक इमारत अतिशय धोकादायक परिस्थितीमध्ये आहे. गेल्या काही दिवसापूर्वी या इमारतीची पाहणी (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन या इमारतीला धोकादायक इमारत ठरवण्यात आली आहे. तरी सदर इमारतीमुळे कोणत्याही प्रकारची दुर्घटना होण्याआधीच ती इमारत जमिनदोस्त करण्यात यावी व त्या ठिकाणी नवीन इमारत बांधणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :- ८** सन्मा. केशव हनुमंत घोळवे यांचा दि. १४/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

श्रध्दा सोसायटी ते रेणुका गुलमोहर सोसायटी पर्यंत वाहने दुतर्फा उभी असतात. त्या कारणाने स्थानिक नागरिकांना तातडीचे वेळेस रस्त्यावरुन वाट काढताना सदरील नागरिकांना त्रास होतो. तरी सदर रस्त्यावर नो पार्किंग करुन मिळणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :- ९** सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि. ७/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

अ प्रभाग समितीमधील सर्व सन्मा.नगरसदस्य आपापल्या प्रभागातील रस्ते,चौक तसेच मनपाच्या विविध मिळकतींना नामकरणाचे प्रस्ताव अ प्रभाग समितीचे मान्यतेसाठी पाठवितात. नवीन प्रभाग रचनेमुळे ४ सदस्यांचा एक प्रभाग याप्रमाणे रचना झालेली आहे त्यामुळे असे प्रस्ताव पाठविताना संबंधित प्रभागातील सर्व लोकनियुक्त नगरसदस्यांच्या संमतीने नामकरणाचे तसेच इतर प्रस्ताव सादर करावेत.

प्रभागाची रचना बदलली असलेमुळे पुर्वी नामकरणाचा ठराव मंजूर झालेला असतो परंतु त्याची माहिती घेणे किंवा इतर कारणास्तव असे ठराव समितीसमोर मंजूरीला येतात. काही प्रसंगी मंजूर होतात. तरी असे दुबार ठरावामध्ये पूर्वी झालेला ठराव ग्राह्य धरण्यात येईल यास मान्यता देणे.

**विषय क्रमांक :-१०** सन्मा.सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. १४/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मुंबई पुणे रोड बॉम्बे सिलेक्शन जवळ फायबरच्या मुता-या आहेत, तेथे अनैतिक कामासाठी वापर हात असुन त्याचा इतर नागरिकांवर परिणावर परिणाम होत आहे. तरी सदरच्या मुता-या काढून टाकणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :-११** सन्मा.सदस्या वैशाली काळभोर यांचा दि. १४/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१४ काळभोरनगर येथील सुनिल दुर्गे चौक येथे वारकरी सांप्रदायाचे शिल्प बसवून चौकाचे सुशोभीकरण करण्याचे प्रस्तावास मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 23
दिनांक- 14/08/2018
सुचक: मा. कोमल मेवाणी

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.वैशाली जालिंदर काळभोर

संदर्भ: सन्मा.सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दिनांक ०६/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१९ मधील नदीच्या किनारी मोठया प्रमाणात झोपडपट्टी परिसर आहे. त्या ठिकाणी आज पर्यंत संरक्षक भिंत बांधण्यात आलेली नाही. दरवर्षी पावसाळयात नदीचे पाणी वाढल्याने ते झोपडपट्टीमध्ये शिरुन गरीब नागरिकांचे मोठे नुकसान होते. तसेच संरक्षक सीमा भिंत नसल्यामुळे नदी किनारी अतिक्रमण ही वाढत आहे. तरी प्रभाग क्र.१९ मधील

बौध्दनगर, एमआयडीसी परिसर,पत्राशेड लिंक रोड, स्मशानभूमी परिसरापासून ते आंबेडकर कॉलनीपर्यंत नदी किना-याच्या परिसरामध्ये संरक्षक भिंत बांधणेचा विषयावर चर्चा झाली असता, अ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नदीपात्राचे किना-यावर सर्व ठिकाणी संरक्षक भिंत बांधणेत यावी याप्रमाणे सदस्यांनी मागणी केली. या मागणीसह अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रस्तावानुसार व ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधावी याप्रमाणे या उपसूचनेह प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 24 विषय क्रमांक 2
दिनांक 14/08/2018 विभाग : : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा.कोमल मेवानी अनुमोदक : मा. वैशाली जालिंदर काळभोर

संदर्भ:-१. सन्मा.सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दिनांक ०६/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील भाटनगर परिसरामध्ये महानगरपालिकेचा मातोश्री रमाबाई आंबेडकर दवाखाना आहे.सदर दवाखान्याची अतिशय दुर्दशा झालेली आहे. दवाखान्याच्या पहिल्या मजल्यावर आरोग्य विभागाचे कार्यालय आल्याने तेथील आरोग्य कर्मचा-यांमुळे दवाखान्याची तोडफोड झालेली आहे. दवाखान्याच्या टेरेसवर दारुच्या बाटल्या पडल्या असून इतर काही घाणेरडया स्वरुपांच्या कामांमुळे सदर दवाखान्याची अवस्था वाईट झाली आहे. सदर ठिकाणचे टॉयलेट,ड्रेनेज पाईप तुटलेले आहेत तसेच दरवाजे देखील मोडकळीस आलेले असून दवाखान्यातील वायरींग जीर्ण झालेली आहे. या सर्व गोष्टींची दुरुस्ती करणे अत्यंत अनीवार्य झाले आहे. दवाखान्याच्या आतील व बाहेरील भागांची दुरुस्ती करुन त्याची रंगरंगोटी करण्यात यावी.

प्रभाग क्र.१९ मध्ये ७९ टक्के झोपडपट्टी आहे. भाटनगर,बौध्दनगर,रमाबाईनगर व पत्राशेड या परिसरातील गोरगरीब नागरिक मोठया प्रमाणामध्ये उपचार घेण्यासाठी येत असतात त्यामुळे रुणांस व कर्मचा-यांस सध्या असलेली जागा अपूरी पडत आहे. त्यामुळे पहिल्या मजल्यावरील आरोग्य विभागाचे कार्यालय इतर ठिकाणी स्थलांतरीत करुन कार्यालयाची जागा दवाखान्यास देणेत तसेच दवाखान्याची दुरुस्ती लवकरात लवकर करणेस मान्यता देणेत आली.

तसेच प्र.क्र.१९ मधील लिंक रोड स्मशानभूमि ते लक्ष्मी धर्मशाळेपर्यंतचे रस्त्याच्या कडेने दोन्ही बाजूने फुटपाथ बनविणेचे उपसूचनेच मान्यता देणेत आली.

याप्रमाणे ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 25 विषय क्रमांक 3
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा.शैलजा मोरे अनुमोदक: शर्मिला बाबर

संदर्भ :- सन्मा. सदस्या सौ.शैलजा अविनाश मोरे यांचा दि.08/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

से.नं.२८, गंगानगर हनुमान मंदिरासमोरील उदयानाचे नामकरण अजूनपर्यंत झालेले नाही. तरी से.नं.२८ गंगानगर हनुमान मंदिरा समोरील उदयानाचे नाव **" पं.दीनदयाल उपाध्याय उदयान"** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 26 विषय क्रमांक 4
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा मोरे अनुमोदक : शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा. सदस्या सौ.शैलजा अविनाश मोरे यांचा दि.08/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

गेले अनेक वर्षापासून से.नं.२८ गंगानगर स्वामी समर्थ मंदिरासमोरील उदयानाचे नामकरण अजून पर्यंत करण्यात आलेले नाही. तरी से.नं.२८ गंगानगर स्वामी समर्थ मदिरासमोरील उदयानाचे नाव **"श्री छत्रपती शिवाजी महाराज उदयान"** असे नाममकरण करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 27 विषय क्रमांक 5
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा मोरे अनुमोदक: मा.केशव घोळवे

संदर्भ :- सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि.31/07/2018 रोजीचा प्रस्ताव.

महात्मा ज्योतिराव फुले जेष्ठ नागरिक संघ यांचे दिनांक ३१/७/२०१८ रोजीचे पत्रान्वये त्यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे विरंगुळा केंद्राला बहिरवाडे क्रिडांगणातील पक्की जागा (मैदानातील वाचनालय) देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 28 विषय क्रमांक 6
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सूचक: मा.प्रमोद कुटे अनुमोदक : मा. जावेद रमजान शेख

संदर्भ :- सन्मा.सदस्य श्री प्रमोद प्रभाकर कुटे यांचा दि. 14/08/2018 रोजीचा प्रस्ताव

विठ्ठल मंदिर, विठ्ठलवाडी, आकुर्डी लगत असणा-या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी तळावर गेल्या काही दिवसापासून महानगरपालिकेच्या जागेवर दर शनिवारी अनधिकृतरित्या आठवडे बाजार घेतला जात आहे. परंतु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी मार्गाचे क्रॉक्रिटीकरणाचे काम चालू असल्यामुळे सदर रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या मोठया प्रमाणावर निर्माण झाली आहे. या वाहतूक कोंडीमुळे त्या ठिकाणी अपघाताची संख्या वाढली आहे. तरी सदर आठवडे बाजार तातडीने बंद करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 29 विषय क्रमांक 7
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सूचक: मा.प्रमोद कुटे अनुमोदक : मा. जावेद रमजान शेख

संदर्भ :- सन्मा.सदस्य श्री प्रमोद प्रभाकर कुटे यांचा दि. 14/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.क्र.१४ मधील महानगरपालिकेच्या असलेल्या कांतीलाल खिंवसरा विद्यालय, मोहननगर,चिंचवड,पुणे १९ या शाळेमधील एक इमारत अतिशय धोकादायक परिस्थितीमध्ये आहे. गेल्या काही दिवसापूर्वी या इमारतीची पाहणी (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन या इमारतीला धोकादायक इमारत ठरवण्यात आली आहे. तरी सदर इमारतीमुळे कोणत्याही प्रकारची दुर्घटना होण्याआधीच ती इमारत जमिनदोस्त करणेत येऊन व त्या ठिकाणी नवीन इमारत बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 30 विषय क्रमांक 8
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सूचक: मा.केशव घोळवे अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा.सदस्य श्री केशव घोळवे यांचा दि. 14/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

श्रध्दा सोसायटी ते रेणुका गुलमोहर सोसायटी पर्यंत वाहने दुतर्फा उभी असतात. त्या कारणाने स्थानिक नागरिकांना तातडीचे वेळेस रस्त्यावरुन वाट काढताना सदरील नागरिकांना त्रास होतो. तरी सदर रस्त्यावर नो पार्किंग करुन मिळणेचे प्रस्तावास तसेच सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचे ऐश्वर्यम सोसायटी कम्फर्ट समोर गायत्री हॉटेल ते विघ्नहर्ता बेकरी तसेच मोटर गॅरेज असल्यामुळे चारचाकी गाडया रिपेअरिंगसाठी येतात. दुतर्फा गाडया उभ्या असतात. त्यामुळे रहदारीस अडथळा होतो. रोज अपघात होतात. तरी त्या ठिकाणी नो पार्किंग करणेचे उपसूचनेसह मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 31 विषय क्रमांक 9
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सूचक: मा.शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला राजू बाबर

संदर्भ :- सन्मा.सभापती अनुराधा गणपत गोरखे,अ प्रभाग समिती यांचा दि. 07/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

अ प्रभाग समितीमधील सर्व सन्मा.नगरसदस्य आपापल्या प्रभागातील रस्ते,चौक तसेच मनपाच्या विविध मिळकतींना नामकरणाचे प्रस्ताव अ प्रभाग समितीचे मान्यतेसाठी पाठवितात. नवीन प्रभाग रचनेमुळे ४ सदस्यांचा एक प्रभाग याप्रमाणे रचना

झालेली आहे त्यामुळे असे प्रस्ताव पाठविताना संबंधित प्रभागातील सर्व लोकनियुक्त नगरसदस्यांच्या संमतीने नामकरणाचे तसेच इतर प्रस्ताव सादर करावेत.

प्रभागाची रचना बदलली असलेमुळे पुर्वी नामकरणाचा ठराव मंजूर झालेला असतो परंतु त्याची माहिती घेणे किंवा इतर कारणास्तव असे ठराव समितीसमोर मंजूरीला येतात. काही प्रसंगी मंजूर होतात. तरी असे दुबार ठरावामध्ये पूर्वी झालेला ठराव ग्राह्य धरण्यात येईल याप्रमाणे प्रस्ताव होता.

सदर प्रस्तावावर सखोल चर्चा झाली असता, चर्चेअंती सभेत प्राप्त प्रस्ताव सभा नियमानुसार व मनपा धोरणानुसार मंजूर करुन व त्याप्रमाणे ठराव करावेत. याप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 32 विषय क्रमांक 10
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सूचक: मा.प्रमोद कुटे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सन्मा.सदस्य श्री प्रमोद प्रभाकर कुटे यांचा दि. 14/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

मुंबई -पुणे रोड बॉम्बे सिलेक्शन जवळ फायबरच्या मुता-या आहेत, तेथे अनैतिक कामासाठी वापर होत असून त्याचा इतर नागरिकांवर परिणाम होत आहे. तरी सदरच्या मुता-या काढून टाकणेचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 33 विषय क्रमांक 11
दिनांक 14/08/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सूचक: मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा.सदस्या वैशाली काळभोर, सन्मा. सदस्य प्रमोद कुटे, सन्मा. सदस्या मिनल यादव
सन्मा. सदस्य जावेद शेख यांचा दि. 14/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१४ काळभोरनगर येथील सुनिल दुर्गे चौक येथे वारकरी सांप्रदायाचे शिल्प बसवून चौकाचे सुशोभीकरण करण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती, अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/169/2018 दिनांक:- 01 /09 /2018

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ----------------------